# प्रकरण - ६

# उपसंहार

कोणत्याही थोर साहित्यिकांच्या वाङमयीन कारकीर्दीचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, त्या साहित्यिकांच्या वाङमयीन कार्यकर्तृत्वाचा प्रारंभच मूळी त्यांच्या वयाच्या तिशीनंतर झालेला दिसतो. मात्र यालाही अपवाद ठरणारे संत ज्ञानेश्वरा सारखे संतकवी असू शकतात. काव्यातून गंभीर तत्त्वज्ञानाचा आविष्कार, आदर्श जीवन सरणी, विचार सरणीचा पुरस्कार आणि अंतिम सत्याचे प्रकटन या सर्व दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणारा भावर्थदीपिका उर्फ ज्ञानेश्वरी सारखा अलौकिक ग्रंथ ज्ञानेश्वरानी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी लिहिला. त्याच्या या ग्रंथाचे मराठी वाङ:मयीन प्रवाहातील स्थान अनन्यसाधारण असलेले दिसते. आधुनिक साहित्याच्या इतिहासात असे अल्पवयातच अलौकिक वाङमयीन कर्तृत्व सिध्द करणारे ग्रंथ क्वचितच आढळतात. अपवादात्मक हिंदी भोषतील धर्मवीर भारती या लेखकाचे उदाहरण द्यावे लागेल. या संदर्भात दुसरे महत्त्वाचे उदाहरण मराठीतील शिवाजी सांवताचे देता येईल शिवाजी सावंताची मृत्युंजय ही कादंबरी १९६७ साली प्रकाशित झाली. त्या वेळी त्यांचे वय अवघे सत्तावीस वर्षाचे होते.

१९६० नंतरचे साहित्य हे अस्तित्ववादी साहित्य म्हणून ओळखले जाते. या साहित्यातून माणसाची एकाकी वृत्ती, पराकोटीची व्यक्तिकेंद्रीतता मानवी जीवनातील क्षुद्रता, पराभवाचे आकर्षग आणि या आकर्षणातून निर्माण होणाऱ्या विकृत आनंदाचे प्रदर्शन करण्यात येत होते. याच काळात सावंताचा लेखन प्रवास एका वेगळ्याच दिशेने सुरू झालेला दिसतो. कर्ण, संभाजी, श्रीकृष्ण अशा महान व्यक्तिमत्तवांविषयी आणि भारतीय संस्कृती विषयी त्यांनी आत्मीयतेने लिखाण केलेले दिसते. स्वाभाविकपणे त्यांनी आपल्या लिखाणातून सामाजिक प्रक्रियेतून विघटनवादी प्रवृत्तीचा त्याग करून, किरट्या आणि बिभत्स वास्तवाला झुगारून देऊन शाश्वत आत्मिक शक्ती आणि उदात्त जीवनमुल्यांचा पुरस्कार केलेला दिसतो. साहजिकच भारतीय संस्कृतीवर पोसलेल्या बहुसंख्य भारतीय मनांना या त्यांच्या लेखनामुळे अपेक्षित दिलास मिळालेला दिसतो. याच काळात नवतेच्या संकल्पनेने भारावलेल्या काही मोजक्या विचारवंतांना सावंताचे हे वाङमय म्हणजे भूतकाळाचा भाबडेपणाने वेध घेण्याचे कृत्य वाटले असेल. परंतु विघटनवादी प्रवृत्तीच्या भोवऱ्यात गटांगळ्या खाणाऱ्या व्यक्तिंना विजिगिषु वृत्ती आणि श्रेष्ठ जीवनमूल्यांचा पुरस्कार करणारे शिवाजी सावंताचे हे साहित्य दीपस्तंभाप्रमाणे वाटावे यात नवल नाही. अशा त्यांच्या 'मृत्युंजय' 'छावा' 'युगंधर' या तीन कादंबऱ्याचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला असून तो अधिकाधिक वस्तुनिष्ठ व व्यापक कसा येईल याकडे जाणीव पूर्वक लक्ष दिले आहे हा अभ्यास करीत असताना प्राप्त झालेला निष्कर्ष या प्रकरणांत मांडले आहेत.

'मराठी कथा वाङमय' या पहिल्या प्रकरणात कथा, नाटक, कादंबरी या वाङमय प्रकाराचा

प्रारंभ मराठी साहित्य विश्वात केव्हा व कसा झाला. तसेच या वाङमय प्रकारांमध्ये झोलेले बदल आणि त्यांची सध्यस्थिती याचा आढावा घेतला आहे.

कथा, नाटक, कादंबरी हे आधुनिक वाङमयाचे आकृतिबंध छापखान्याच्या निर्मितीनंतर इंग्रजी राजवटीत उद्यास आले. तत्पूर्वी कथा व नाटक या भूमींतील लोक वाङमयीन रूढ भाग होते. १९ व्या शतकात इंग्रजी राजवटीत भाषांतरित, रूपांतरित आणि स्वतंत्रपणे आधुनिक साहित्याची निर्मिती होऊ लागली. तिचा प्रसार प्रारंभी नियतकालिकातून मोठया प्रमाणावर झाला.

आधुनिक साहित्याचा विकास जसजसा झाला तस तसा त्यात अंतर्बाह्य बदलही होऊ लागले. त्यातूनच आशय व अभिव्यक्तीनुसार साहित्यप्रकारात विविधता येऊ लागला. परिवर्तनात सूक्ष्मता आणि सखोलता येऊ लागली आणि या साहित्याची समीक्षेच्या अंगाने चिकित्सा होऊ लागली. कथेचा प्रभाव, नाटकाचे प्रायोगिक मूल्य, कादंबरीतील जीवनमूल्य, नवविचार या अंगाने विचारमंथन होऊ लागले.

'शिवाजी सावंत यांची वाङमय निर्मिती' या प्रकरणात शिवाजी सावंतानी लिहिलेल्या कादंबरी, नाटक, व्यक्तिचित्रणे, चरित्रे, ललीत लेख, वैचारिक लेखन, गीतरचना ह्याच बरोबर त्यांनी संपादित केलेल्या वाङमयाचा आढावा घेतला आहे. असा आढावा घेत असताना त्यांच्या वैयक्तिक जीवन प्रवाहाचा सुद्धा वेध घेतला आहे.

ह्या प्रकरणामधून शिवाजी सावंत म्हणजे आदर्शाची वागपूजा बांधणारे लेखक असलेले दिसतात. त्यांची दृष्टी आणि लेखणी सातत्याने समाजातील आदर्शांचा शोध घेत असलेली दिसते. श्रेष्ठ निवड ही त्यांच्या साहित्य निर्मिती मागील प्रेरणा असलेले दिसते. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून जेवढी सहृदयता जाणवते तेवढीच परखडता ही प्रत्ययास येते.

भावप्रधानता हा त्यांच्या संपुर्ण साहित्यातून विशेष प्रत्ययास येतो. सावंतानी आपल्या कलाकृतीसाठी निवडलेली प्रत्येक व्यक्तिरेखाही पौराणिक काळातील किंवा इतिहासातील एक थोर व्यक्ती आहे. अशा व्यक्तिरेखा त्यांनी इतिहासातून व्यक्त न करता, अशा व्यक्तिरेखेतून त्यांनी इतिहास चित्रित केलेला आहे.

शिवाजी सावंतानी साहित्य विश्वात कादंबरीकार म्हणूनच पदार्पण केले. कादंबरी लेखनाच्या समातंर काळात त्यांनी कथालेखन चरित्र लेखनही केले पण त्याचा फारसा प्रभाव पडण्या इतका ठसा उमरला नाही. त्यांच्या इतर लेखनाचा कादंबरी इतका बोलबाला झाला नाही.

'शिवाजी सावंताच्या कादबंरीचे वेगळेपण' या प्रकरणात मृत्युंजय, छावा, युगंधर या तीनही कादंबऱ्यांचा लोकप्रियतेचा व वेगळेपणाचा आढावा घेतला आहे. त्यासाठी कादंबऱ्याच्या पौराणिक वातावरण निर्मिती, व्यक्तिचित्रणे, भाषा, निवेदन, शैली, संवाद, प्रसंग, सूक्ष्म मनोव्यापार यांचा विचार केला आहे. यातील मृत्युंजय व युगंधर चा आत्मनिवेदनपर आकृतिबंध वाचकांवर प्रभाव टाकतो. तसेच त्यातील कल्पना रम्य चित्रण अप्रतिम उतरली आहेत. 'छावा' मात्र अत्यंत वस्तुनिष्ठ स्वरूपात परंपरागतच आकृतिबंधात आहे.

असे असले तरी या तीनही कादंबऱ्यांची वाङमयीन अंगे समकालीन कादंबरी पेक्षा वेगळी व सरसच आहे. सावंतांनी पौराणिक महाकाव्यातून आपल्या दोन कादंबऱ्याचे नायक निवडले तर एक महत्त्वपुर्ण ऐतिहासीक कालपटातील नायक निवडला. पौराणिक आशयाच्या कादंबरीत त्यांनी गूढतेची आवरणे काढण्याचा आणि त्यातील व्यक्तिरेषा वास्तवाला भिडविण्याचा प्रयत्न केला.

शिवाजी सावंतांनी आपल्या कादंबऱ्यात जे नायक चित्रीत केले. त्यांच्यावर त्यापूर्वी ही लेखन झाले आहे. कादंबरी व नाटक चित्रीत केले. या साहित्यप्रकारातून हे नायक चित्रित झालेले आहेत. परंतु त्यातील पारंपारिक, चाकोरीबद्ध, पूर्वग्रहबाधीत चित्रण शिवाजी सावंतांनी आपल्या अभ्यासपूर्ण चिकित्सक तर्कसंगत दृष्टीने तपासून घेतले व आपल्या प्रतिभा बलाने त्यातील कांदबऱ्या वेगळया व वैशिष्यपूर्ण ठरल्या.

शिवाजी सावंताच्या कादंबरीतील नायक ह्या प्रकरणात कर्ण संभाजी, श्रीकृष्ण, ह्या तीनही नायकांच्या व्यक्तीमत्त्वामधील गुण वैशिष्टयांचा आढावा घेतला आहे.

सावंताच्या कादंबऱ्या नायक प्रधान आहेत. हे नायक असामान्य कोटीतील आहेत. 'युगंधर' व 'छावा' च्या नायकांचा कौटुंबिक सामाजिक दर्जा महान आहे. मृत्युंजय चा नायक जन्मापासून उपेक्षित, दुदैवी ठरला तरी ऐन तारूण्यात तो कौरवराज दुर्योधनाकडून अंगराज म्हणून सन्मानित होतो. या तिन्ही नायकांमध्ये महान कर्तृत्व आहे. काही साम्यस्थळे आहेत, काही साम्य घटना आहेत. काही साम्य विचार आहेत. या तिन्ही कादंबऱ्याचा कलात्मक रचनेतून त्यांच्या नायकातील माणूसपणाची उकल करण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. तो अभ्यासपूर्ण व तर्कसंगत आहे. परंतु 'छावा'मधील संभाजीची व्यक्तीरेखा सोडल्यास श्रध्देच्या प्रभावातून व कवीमनाच्या मनःस्वितेतुन नायकांचे चित्रण झालेले आहे. आधुनिकतेतून नवतेतून सृजनाच्या प्रेरणा घेण्याऐवजी पुराणातुन व्यक्तिरेखा निवडून त्यांची स्वत:स भावलेली रूप नव्या तर्कसंगत दृष्टिकोनातून पुनर्रचित केली.

'मृत्युंजय' चा नायक कर्ण व 'युगंधर' चा नायक श्रीकृष्ण या व्यक्तिरेखावरील अद्भुत, चमत्कृतीपूर्ण अलौकिक संदर्भांची आवरणे काढून त्याचे असामान्य माणूसपणं शिवाजी सावंतानी उकलून दाखविण्याचा प्रयत्न केला. 'छावा' चा नायक संभाजी या व्यक्तीरेखेवर कुत्सित, पूर्वग्रहदुषित, अनैतिहासिक, कपोलकाल्पित कलंक जे त्यांच्या हित शगुंनी, इतिहासकारांनी व साहित्यिकांनी लावले होते. ते ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास करून तर्कसंगत व साम्यक दृष्टीने सत्याची पडताळणी करून दूर केले व संभाजीचे महान 'माणूसपण' शिवाजी सावंतांनी चित्रित केले आहे.

तात्पर्य केवळ कुमारी मातेच्या पोटी जन्माला आल्यामुळे ज्याच्या नशिबी उपेक्षा आली व ज्याचे माणूसपण ठायी ठायी लाथडले गेले तो मृत्युंजय चा नायक कर्ण ज्याचा जन्मच रहस्यरंजित अद्भुतरम्यतेतून झाला व आयुष्यभर ज्याला दृष्टांचे निर्दानल करून मनुष्य चा मनुष्य जीवनाचे तत्त्वज्ञान होऊन अलौकिंक देवत्वाच्या दिप्तीमान आवरणात रहावे लागले. तो 'युगंधर' चा नायक कृष्ण आणि ज्याच्या नशिबी नियतीचे सावत्रपण जन्मापासून आले व माथ्यावर छत्रपतींची छत्रचामरे आली तरी कुटनीती व कपट कारस्थानांनी ज्याची पाठ सोडली नाही. तो 'छावाचा' नायक संभाजी आपल्या कादंबरीत अजरामर करुन शिवाजी सावंतांनी आपल्या कांदबरीचे मानदंड उभे केले हे त्यांच्या प्रतिभेची उत्तुंग सामर्थ्य होय.

पाचवे प्रकरण हे शिवाजी सावंतांच्या कादंबरीवर जे आक्षेप घेण्यात आले आहेत. त्यांचे अभ्यासपूर्ण पध्दतीने निराकरण केले आहे. 'मृत्युंजय' या कादंबरी मध्ये 'मृत्युंजयता' या संकल्पनेचा अर्थबोध करण्याचा प्रयत्न केला आहे. कर्ण जीवनातील काही घटनामागील लेखकाच्या मानसिकतेचा वेध घेतला आहे. 'छावा' मधील चमत्कृतीपूर्ण प्रसंगा मागील कारणांची मीमांसा केली आहे. तसेच 'युगंधर' मधील 'श्रीकृष्णांच्या' उद्‌गारांची तर्क शुध्दता पडताळण्याचा प्रयत्न केला आहे.